लोकमत पू. पान क्र.।

पैशांचा तगादा आणि रात्रभर कोंडून ठेवल्याच्या रागातून हत्या

# खदानीत सापडलेल्या मृतदेहाचे गूढ अखेर उलगडले

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** खदानीत सापडलेल्या मृतदेहाचे गूढ पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी उलगडले आहे. मित्रानेच पैशांचा तगादा लावला आणि रात्रभर कोंडून ठेवल्याच्या रागातून हत्या केल्याचे तपासात उघड झाले असून आरोपीला अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी प्रवीण बनगोसावी यांनी दिली आहे.

धानिव पांढरीपाडा परिसरातील गुंजाळकर यांच्या दगडाच्या खदानीत १७ जानेवारीला एक मृतदेह सापडला होता. अरबाज राईन (२१) याच्या तक्रारीवरून पेल्हार पोलिसांनी १८ जानेवारीला अकस्मात मृत्यूची नोंद केली. या चौकशीत जाबरपाड्यातील ब्रिजेश चौरसिया (४१) याचा मृतदेह असल्याचे निष्पन्न झाले.




पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी हत्येचे गूढ उलगडून आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे.

■ ही कामगिरी पोलिस उपायुक्त जयंत भजबळे, सहायक पोलिस आयुक्त बजरंग देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, पोलिस निरीक्षक (गुन्हे) कुमारगौरव धादवड, गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि सोपान पाटील, उपनिरीक्षक तुकाराम भोपळे, हवालदार योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, अनिल शेगर, वाल्मीक पाटील, रवी वानखेडे, संजय मासाळ, मिथुन मोहिते आदींनी केली.

## बहिणीने व्यक्त केला होता संशय

**१** ब्रिजेश चौरसिया याची बहीण सारिका चौरसिया हिने भावाची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पेल्हारचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि सोपान पाटील यांना सूचना देऊन प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले होते.

**२** पोलिसांनी केलेल्या चौकशीत ब्रिजेश व त्याचा मित्र बलराम यादव हे दोघे गुन्हा घडेपर्यंत एकत्र असल्याचे आणि खदानीमध्ये ब्रिजेशला धक्का मारून बलरामला पळून जाताना पाहिल्याचे समजले.

**३** बलराम ऊर्फ बलीराम (२७) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली. बलरामने ब्रिजेशकडून ५५ हजार रुपये घेतले होते. यापैकी २२ हजार रुपये परत देऊनही ब्रिजेशने त्याला १६ जानेवारीला संध्याकाळी जाबरपाडा येथील दुकानात बोलावले.

**४** त्याच्याकडून १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर ३ लाख रुपये घेतल्याचे लिहून घेतले. त्यानंतर त्याला रात्रभर डांबून ठेवले. पैशांचा तगादा लावत असल्याचा आणि रात्रभर कोंडून ठेवल्याचा राग मनात धरून जीव घेण्याच्या उद्देशाने खदानीत ढकलून ठार केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करून गुरुवारी अटक केली आहे.

## तलवार, सुरा केला जप्त



नालासोपारा : धानिवबाग तलाव परिसरातून बुधवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान पेल्हार पोलिसांनी दोनं आरोपींजवळून तलवार, सुरा जप्त केला आहे.

आरोपी पोखन साव (वय ५०) आणि अब्दुल शहा ऊर्फ बडा (२३) या दोघांनी मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले बंदुका, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरण्यात येईल, अशी इतर कोणतीही वस्तू बाळगण्यास मनाई आदेश असताना आदेशाचा भंग करून तलवार, सुरा हे हत्यार बाळगले. पोलिस अंमलदार रवी वानखेडे (३८) यांनी तक्रार देत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी तलवार, चाकू, मोबाइल आणि रिक्षा जप्त करून आरोपींना अटक केली आहे.

## नोकराने केली लाखोंची चोरी



नालासोपारा : पेल्हारच्या जाबरपाडा येथील राज सोसायटीत राहणाऱ्या अनुज पटेल (३५) या व्यापाऱ्याचा याच परिसरात कारखाना आहे. कारखान्यात काम करणारे कामगार मोहम्मद जुनेद, दिलावर, आदिल आणि जुनेदचा भाऊ छोटू या चौघांनी ३१ मार्चला रात्री ३ लाख ४२ हजार रुपये किमतीचे टिवल कॉटनचे ७६० नग लबाडीने चोरी करून नेले आहे. गुरुवारी पेल्हार पोलिसांनी या नोकरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## सोनाराची फसवणूक




नालासोपारा : निळेमोरे गावातील साई द्वारका बिल्डिंगमध्ये राहणारे पन्नालाल घोडई (५२) यांचे गावदेवी रोडवरील आदिराज बिल्डिंगमध्ये सोन्याच्या दागिन्यांचे दुकान आहे. त्यांच्या दुकानातून लाखो रुपयांच्या दागिन्यांची चोरी झाली आहे.

पन्नालाल घोडई यांच्या दुकानात ३० मार्चला सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास दोन आरोपी महिला आल्या. त्यांनी बिंदीया, कानातील कुडी दाखविण्यात व्यस्त करत, हातचलाखी करून कागदाच्या खालून ५ लाख ५० हजार रुपये किमतीचे ११० ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडट, १० लेडीज अंगठी असलेले पॅकेट उचलून ते दुसऱ्या महिलेकडे पास करून चोरून नेले. पन्नालाल यांनी गुरुवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत पृ. पान क्र. १

# आधी लग्नाच्या आमिषाने, नंतर धमकी देत अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** आधी लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केला व नंतर शारीरिक संबंधांचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन पुन्हा बळजबरीने अत्याचार केल्याप्रकरणी भाईंदर पोलिसांनी राहुल जयप्रकाश पाटील (३३, रा. गणेश निवास, मोरवा, उत्तन मार्ग, भाईंदर पश्चिम) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

नोव्हेंबर २०२० ते डिसेंबर २०२३ दरम्यान राहुल पाटील याने लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीसोबत शरीरसंबंध केले. त्याचे फोटो काढून ते व्हायरल करण्याची धमकी देऊन बळजबरीने वारंवार इच्छेविरुद्ध तिच्यावर अत्याचार केला. त्याने तिला मीरा रोड, काशिमिरा तसेच बोरिवली व




गोरेगाव येथील विविध लॉजवर नेऊन अत्याचार केल्याचे तरुणीने फिर्यादीत नमूद केले आहे.

तरुणीच्या फिर्यादीवरून तरुणाविरोधात ४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला गेला आहे. याप्रकरणी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सूर्यकांत नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संजय शिंपणे तपास करत आहेत.

लोकमत पृ. पान क्र. 2

# स्कायवॉकचे पत्रे पडून विद्यार्थिनी जखमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेरील स्कायवॉकचे पत्रे पडून १९ वर्षीय विद्यार्थिनी जखमी झाली आहे. नयानगर पोलिसांनी स्कायवॉकला पत्रे लावणारा ठेकेदार आणि त्याची देखभाल करणाऱ्या मीरा-भाईंदर महापालिकेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

कनकियातील सिनेमॅक्सजवळ एन. जी. शेल्टर इमारतीत राहणारी नियती राहुल चौबळ ही विद्यार्थिनी गुरुकुल स्पोर्टस् अँड करिअर अकॅडमीमधून पोलिस भरती सराव करते. ४ एप्रिलच्या सायंकाळी ती शिक्षक व मित्रासह पोलिस भरती सरावाकरिता मीरा रोड रेल्वे स्टेशन येथे जात होती. मीरा रोड रेल्वे स्थानकाबाहेरील स्कायवॉक खालून जात असताना अचानक स्कायवॉकचे पत्रे निखळून खाली तिच्या अंगावर पडले. त्यात तिच्या डोक्यावर पत्रा पडल्याने डोक्याला जखम होऊन सहा टाके पडले. याप्रकरणी पत्रा लावणाऱ्या व त्याची डागडुजी पाहणाऱ्या मीरा-भाईंदर महापालिकेच्या संबंधित यंत्रणेविरुद्ध निष्काळजीपणा आणि हयगयीबद्दल नयानगर पोलिसांनी ४ एप्रिल रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला आहे.

# मोबाइल खरेदीत डॉक्टरची लाखाची फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड येथील एका डॉक्टरची ऑनलाइन मोबाइल खरेदीत लाख रुपयांची फसवणूक झाली आहे.

मीरा रोडच्या सृष्टी, कल्पतरू बिल्डिंगमध्ये डॉ. कृष्णकुमार सिंग हे राहतात. त्यांनी ओएलएक्सवर मोबाइल विकायचा आहे, अशी जाहिरात पाहिली होती. वरचंद वेलजी पंचाण व संदीप कुमार यांनी आयफोन १५ मॅक्स मॉडेल मोबाइलची जाहिरात दिली होती.

तो मोबाइल डॉ. सिंग यांनी त्यांच्याकडून २५ हजार रुपये गुगल पेद्वारे व ८५ हजार रुपयांची रोख रक्कम देऊन खरेदी केला; परंतु त्यांना विकलेला आयफोन हा वरचंद व संदीप यांचा नसताना त्यांनी डॉ. सिंग यांना देऊन त्यांची १ लाख १० हजार रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी काशिमिरा पोलिसांनी ४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला आहे. पोलिस अधिक तपास करत आहेत.

CamScanner

पुढारी पृ.पान क्र.2

# २९ गावे महापालिकेत समाविष्ट करण्यास विरोध

## नगरविकास खात्याचा कोणताही अभ्यास नाही; नागरिकांमध्ये नाराजीचा सूर कायम

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

नुकतेच २९ गावांच्या बाबतीतील सर्व याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळल्या असून नगरविकास विभागाने २९ गावे महापालिकेत समाविष्ट करण्याबाबत प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले होते. यानंतर १४ फेब्रुवारी २०२४ रोजी नगरविकास विभागाने हरकती नोंदवण्यासाठी एक परिपत्रक काढले होते. सध्या या परिपत्रकावर हरकती नोंदवण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे. मात्र शासनाच्या या निर्णयाबाबत स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण असून गावे महापालिकेत समाविष्ट करण्यास प्रखर विरोध आहे.

कारण अगोदरच अनेक पातळ्यांवर अपयशी ठरलेल्या महापालिकेच्या हातात ही गावे गेल्यास गावांचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही, असेच स्थानिकांचे मत आहे. बेसुमार अनधिकृत बांधकामे, मुलभूत सोयी-सुविधांची वानवा, आरक्षित भूखंडांचे रक्षण करण्यात अपयशी ठरलेली महापालिका गावांचा विकास करण्यास असमर्थ असून यामुळे गावाचा विकास होण्याऐवजी गावे भकास होण्याचीच भीती स्थानिकांना आहे.सदर २९ गावे महापालिकेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने काय अभ्यास केला आहे तसेच सदर अधिसूचना काढण्यासाठी संबंधित मंत्रालयाने नगरविकास विभागाला दिलेल्या आदेशाची प्रत, गावांचा महापालिकेत समावेश केल्यास स्थानिकांना होणारा फायदा तसेच शासनाचा नेमका कोणता फायदा होणार आहे व स्थानिकांचा विरोध असतानाही गावे महापालिकेत समाविष्ट करण्यासाठी शासन का



आग्रही आहे याबाबतच्या अहवालाची प्रत व इतर संबंधित कागदपत्रांची मागणी माहिती अधिकारात चरण भट यांनी मागणी केली होती. यावर उत्तर देताना नगरविकास विभागाच्या अवर सचिव निकेता पांडे यांनी कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता न करता कार्यालयीन कार्यपद्धतीनुसार सद्यस्थितीत कामकाज सुरू असल्याचे कळवले असून उपरोक्त प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाल्यावर माहिती पुरवणे शक्य असल्याचे म्हटले आहे. यावरून नगरविकास विभागाने या २९ गावांबाबत कोणताही अभ्यास न केल्याचे उघड होत आहे. यावरून १४ फेब्रुवारी २०२४ रोजी शासनाने काढलेली अधिसूचना ही बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट होत आहे.

ही गावे ही निसर्गसंपन्न असून हरीत वसई ही वसईची ओळख या गावांमुळेच आहे. येथे राहणारे स्थानिक ही ९० टक्के शेतीवर अवलंबून असून आजही या ठिकाणी पिढीजात शेती केली जाते. ही गावे आकारमानाने छोट्या क्षेत्रफळाची असून या गावांना अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणजेच वसई-विरार महापालिकेत समाविष्ट केल्याने स्थानिकांना विविध करांच्या रुपाने आर्थिक भूर्दंड पडणार असून भविष्यात या ठिकाणी मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्यामुळे पर्यावरणाची हानी होणार आहे.

लोकसंख्येची घनता, स्थानिक प्रशासनासाठी निर्माण होणारा महसूल, कृषीतर कार्यक्रमांमधील रोजगाराची टक्केवारी व इतर आर्थिक महत्वाचे घटक याबाबत नगरविकास विभागाने कोणताही अभ्यास केलेला दिसून येत नाही. भारतीय संविधान कलम २४३ डब्ल्यू मधील तरतुदीनुसार ग्रामीण क्षेत्राला शहरी क्षेत्रात परिवर्तित करण्यासाठी थोडे लहान नागरी क्षेत्र व अधिक मोठे नागरी क्षेत्र अशा दोन तरतुदी उपलब्ध आहेत. या तरतूदीनुसार या गावांना थोडे लहान नागरी क्षेत्राच्या श्रेणीत आणून एक वेगळी प्रशासकीय यंत्रणा या गावांसाठी राबवावी, अशी आग्रही मागणी चरण भट यांनी केली आहे.

### थोडे लहान नागरी क्षेत्र घोषित करण्यात यावे

मुळात २९ गावांच्या लोकसंख्येचा व भौगोलिक रचनेचा अभ्यास न करता तसेच गावांमध्ये महापालिका प्रशासन का हवे याबाबतचा कोणताही अहवाल सादर न करता नगरविकास खात्याने थेट गावे महापालिकेत समाविष्ट करण्याबाबत हरकती नोंद करणे हे बेकायदेशीर असल्याचे वक्तव्य भट यांनी केले आहे. प्रत्यक्षात या २९ गावांना महापालिका क्षेत्रात घेण्याची कोणतीही गरज नसून या गावांकरिता एक वेगळी प्रशासकीय यंत्रणा उभारावी व संविधानातील २४३थ कलमातील तरतुदीनुसार थोडे लहान नागरी क्षेत्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

CamScanner

पुढारी पान क्र. १

# इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनीचा मुद्दा चर्चेला

## मिरा-भाईंदर शहरातील हजारो एकर जमिनीवर कंपनीची मालकी

**भाईंदर : राजू काळे**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही मिरा-भाईंदरमधील ३ हजार ६८८ एकर जागेत दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट या ब्रिटिशकालीन कंपनीची मालकी असल्याचे शासन दप्तरी नमूद आहे. या जागेवरील विकासासह पुनर्विकासासाठी कंपनीकडून ना हरकत दाखला मिळविण्यासाठी लाखो ते कोट्यवधीचे शुल्क वसुल केले जाते. कंपनीची हि वसुली जाचक असून ती रद्द करण्याची मागणी अनेकदा सरकार दरबारी करण्यात आली. मात्र त्यावर आश्वासनांखेरीज कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही. यंदा लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा या ब्रिटिशकालीन कंपनीच्या मालकीचा मुद्दा चर्चेला आला असून त्यावर महसूल मंत्र्यांनी नेहमीप्रमाणे आश्वासन दिल्याने त्या कंपनीच्या मालकी जागेत वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न निकाली निघणार कि तो केवळ निवडणुकीचाच जुमला ठरणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

१८७१ मध्ये शहरातील घोडबंदर, नवघर, मीरागाव, चेना, काशीगाव, राई, मुर्धा, मोर्वा, भाईंदर पश्चिम, खारीगाव, गोडदेव गावांतील शेत जमीनीत लगतच्या भाईंदर खाडीचे पाणी शिरुन शेतीचे नुकसान होत असे. शेतीचे नुकसान होऊनही ब्रिटिश येथील शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करीत होते. शेतीच्या नुकसानीत शेतसारा देण्यास शेतकऱ्यांनी नकार देत खाडीकिनारी बंधारा बांधण्याची मागणी केली. ती मान्य करीत ब्रिटीशांनी बंधारा बांधकामाचा ठेका रामचंद्र लक्ष्मणजी या व्यक्तीला दिला. त्याच्या मोबदल्यात शेतकऱ्यांकडुन शेती उत्पन्नाच्या एक तृतीयांश शेतसारा वसुल करुन तो ब्रिटिशांच्या तिजोरीत जमा करण्याचे ठरविण्यात आले. १९४५ मध्ये रामचंद्र यांच्याकडुन बांधबंदिस्ताची जबाबदारी दि इस्टेट इन्वेस्टमेंट कंपनीने काढुन घेत कंपनीचे नाव जमिनीच्या सातबाऱ्यावर चढविण्यात आले.

तदनंतरच्या काळात शेतकऱ्यांनी याविरोधात लढा पुकारल्यानंतर राज्य शासनाकडुन सातबाऱ्यामधील कंपनीची नोंद रद्द ठरविण्यात आली. तर ५ सप्टेंबर २००८ रोजी तत्कालिन जिल्हाधिकारी संभाजी झेंडे यांनी पुन्हा संबंधित जागेची मालकी ब्रिटिशकालिन दि इस्टेट इन्वेस्टमेंट कंपनीच्या नावे करण्याचे आदेश काढुन त्या जमिनींचे सातबारे रातोरात बदलले. यासाठी काही नामांकित व बड्या राजकारण्यांनी विशेष प्रयत्न केले होते. आजही या कंपनीच्या वसुलीमागे भारतीय बडे राजकीय नेते मंडळी असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांची या कंपनीत छुपी भागीदारी असल्याचे बोलले जाते. हि कंपनी या नेतेमंडळींशी हितसंबंध असलेल्या बड्या विकासकांच्या ताब्यातअसल्याचे सांगितले जाते.

ब्रिटीशकालिन ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रणाखालील दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट कंपनी भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर बरखास्त करून त्या कंपन्या ताब्यात घेतल्या. तसेच देशातील अनेक संस्थानं खालसा करून ताब्यात घेतली, काश्मीरला विशेष दर्जा देणारी ३५अ व ३७० कलमे हटविली. पण भारतीय स्वातंत्र्याला ७७ वर्षांनंतरही मिरा-भाईंदरमधील दि इस्टेट इन्व्हेस्टमेंट या ब्रिटीशकालिन कंपनीची मालकी खालसा करण्यास केंद्र तसेच राज्य सरकार अपयशी ठरत असल्याचा आरोप केला जात आहे.

### ना हरकत दाखला घेऊनही कंपनीचे नाव सातबाऱ्यात

राज्य शासनाने विकासकांची जमिनीवरील मक्तेदारी मोडीत काढून त्यावरील गृहनिर्माण संस्थांच्या नावे जमिनी करुन देण्यासाठी २०१२ मध्ये डिम्ड कन्व्हेअन्सची मोहिम सुरु केली. मुळ मालकाच्या परवानगीखेरीज ठराविक कालावधीनंतर गृहनिर्माण संस्थांच्या नावे जमिनीची मालकी थेट गृहनिर्माण संस्थांच्या नावे हस्तांतरण करण्याचा मुख्य उद्देश या मोहिमेचा आहे. मात्र या जमिनी मूळ मालक तसेच विकासक आपल्या परवानगीखेरीज रहिवाशांच्या नावे करीतच नसल्याचे दिसून आले असून त्याला महसूल विभागाकडून देखील बळ दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यातच बहुतांशी इमारती ब्रिटिशकालिन दि इस्टेट इन्वेस्टमेंट कंपनीच्या मालकी जागेत बांधण्यात आल्या आहेत. त्यांच्या बांधकामावेळी विकासकांना कंपनीकडुन लाखो रुपये मोजून ना हरकत दाखला घ्यावा लागत आहे. ना हरकत दाखला घेऊनही कंपनीचे नाव जागेच्या सातबाऱ्यात कायम रहात असल्याने इमारतीचा पुर्नविकास पून्हा कंपनीच्या फेऱ्यात अडकतो. त्यासाठी गृहनिर्माण संस्थांना लाखो ते कोट्यावधी रुपये कंपनीला ना हरकत दाखल्यासाठी द्यावे लागत आहेत.

### कंपनीच्या जिझिया करातून लोकांची मुक्तता केव्हा

यापूर्वी अनेक लोकप्रतिनिधींनी यासंदर्भात विधी मंडळ अधिवेशनात मुद्दा उपस्थित केला असून तत्कालीन महसूल मंत्री चंद्रकांत पाटील यांनी शहरातील विकासकांसोबत चर्चा करून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वकिलांची फौज उभी केल्याचा दावा केला होता. मात्र त्याचा ठोस निकाल अद्याप जाहीर झालेला नाही. अशातच यंदा लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागल्याने शहरातील हजारो एकर जमिनीवर असलेला ब्रिटिशकालीन कंपनीच्या मालकीचा मुद्दा उपस्थित होऊ लागला आहे. त्यात शिंदे गट व भाजप नेतेमंडळींचा समावेश आहे. तत्कालीन विधीमंडळ अधिवेशनात महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी याप्रश्नी राज्य शासन पूर्णपणे सकारात्मक असून त्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी सिनियर कौन्सिलरची नियुक्ती केली जाईल. आणि कंपनीच्या या झिजिया करातून शहरातील लोकांची मुक्तता करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. यंदाही त्यांनी याप्रश्नी कोकण विभागीय अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले आहे.

CamScanner

पुढारी पान क्र.5

# फसवणूक केलेले साडेचार लाख रुपये पोलिसांनी मिळवून दिले परत

**मिरा रोड :** काशीमीरा परिसरात राहणाऱ्या महिलेला शेअर मार्केटमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन, फसवणुक केलेले साडे चार लाख रुपये काशीगाव पोलीसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत. मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा परीसरात राहणाऱ्या तहसिना अफ्रोज खान यांना शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून त्यांची आर्थिक फसवणुक केली होती. या फसवणुकीबाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या तक्रारीची तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांच्या झालेल्या व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळ्या बँकखात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्यासाठी काशीगाव पोलीस ठाणेचे अधिकारी, अंमलदार यांनी वेळोवेळी पाठ पुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी साडे चार लाख रुपये रक्कम त्यांच्या खात्यावर परत मिळवून देण्यात आली आहे. ही कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली काशीगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राहुलकुमार पाटील, पोनि राहुल सोनवणे, पोलीस निरीक्षक, पोहवा सचिन पाटील यांनी पार पाडली आहे.

म.टा.पु. पान क्र.1

# रस्त्याच्या कामामुळे नागरिक त्रस्त

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

नालासोपारा पूर्वेच्या सेंट्रल पार्क येथे रस्त्याची उंची वाढविण्यासाठी आणलेल्या बांधकाम साहित्यामुळे मोठी वाहतूककोंडी निर्माण होत आहे, तर दुसरीकडे रस्ता उंच झाल्याने परिसरातील ५० हून अधिक रहिवासी संकुलांमध्ये पावसाळ्यात पाणी साचण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे नागरिक त्रस्त असून नियोजनाअभावी हे काम होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## धुळीचे साम्राज्य, पाणी साचण्याचा धोका

नालासोपारा पूर्वेला असलेला सेंट्रल पार्क परिसर हा भाग सखल आहे. तुळींज पोलिस ठाण्यापासून ओस्वाल नगरीपर्यंतचा भाग पावसाळ्यात पाण्याखाली जातो. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी पालिकेने तुळींज येथील सेंट्रल पार्क परिसरातील रस्त्याची उंची वाढविण्याचे काम हाती घेतले आहे. मात्र रस्त्याची उंची वाढल्याने परिसरात असलेल्या ५० हून अधिक इमारतींमध्ये पाणी साचण्याचा धोका निर्माण झाला आहे. रस्ता उंच केल्याने रस्त्यावरील पाणी साचण्याची समस्या दूर होईल. पण आमच्या इमारतींमध्ये पाणी साचण्याची नवीन समस्या निर्माण होईल, अशी भीती या संकुलातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. तर रस्ता उंच झाल्याने पाणी साचणार नसल्याचा विश्वास पालिकेने व्यक्त केला आहे. या कामासाठी आणून ठेवलेल्या साहित्यामुळे या परिसरात वाहतूककोंडी होत आहे.

CamScanner

लोकसत्ता पान क्र. 14

# वसई-बाभोळा येथील सह दुय्यम निबंधक कार्यालय स्थलांतरणाला विरोध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसईः** वसई, बाभोळा येथील सह दुय्यम निबंधक कार्यालय वसई न्यायालयाच्या परिसरात स्थलांतरित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मात्र हे कार्यालय स्थलांतरित करण्यास नागरिकांमधून विरोध करण्यात येत आहे.

स्थावर मालमत्ता नोंदणीसाठी वसई तालुक्यात एकूण ६ सह दुय्यम निबंधक कार्यालये आहेत. मागील महिन्यात विरार व नालासोपारा येथील प्रत्येकी दोन कार्यालये एकाच ठिकाणी स्थलांतरित करण्यात आली होती. सह दुय्यम निबंधक कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने जागा मालकांना वाढीव भाडे द्यावे लागत असल्याने या स्वरूपाचा निर्णय जिल्हा सह दुय्यम निबंधक कार्यालयाने घेतला आहे.

वसई कोर्ट, वसई प्रांत कार्यालय, वसई तहसीलदार कार्यालय, वसई पंचायत समिती कार्यालय, सार्वजानिक बांधकाम विभाग उपअभियंता कार्यालय, तालुका भूमी अभिलेख कार्यालय कार्यालये आहेत. त्या ठिकाणी वसई पश्चिमेकडील सुयोगनगर बाभोळा येथील कार्यालय स्थलांतरित केल्यास पक्षकार, अभिकर्ता व वकील वर्ग या वर्गास मोठा त्रास सहन करावा लागेल. बाभोळा येथील कार्यालय वसई न्यायालय परिसरात स्थलांतरित झाल्यास वसई, दिवाणमान, माणिकपूर, गोखिवरे, वालीव, चुळणा, बरामपूर, उमेळमान या मोठ्या भागातील पक्षकारांना दस्त नोंदणीसाठी ये-जा करण्यास अडचणी निर्माण होणार आहेत.

यासाठी याला विरोध करण्यात येत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. याबाबत वरिष्ठांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती ज्येष्ठ वकील ॲड. अशोक मिश्रा यांनी माध्यमांना दिली. दुसरीकडे भाजपाचे वसई विधानसभा मतदार संघाचे प्रभारी मनोज पाटील यांना प्रशासनाचा हा निर्णय अनाकलनीय असल्याचं म्हटले आहे. हा निर्णय बदलण्यासाठी आपण प्रशासनाशी पत्रव्यवहार करणार असल्याचं पाटील यांनी सांगितले आहे.

# वसई, विरारमध्ये पारंपरिक शोभायात्रा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

## ढोलताशा पथके सज्ज

**गुढीपाडव्याच्या स्वागत यात्रेसाठी वसई विरार मधील ढोल ताशा पथके सज्ज झाली आहे. शहरात विविध ठिकाणी शोभायात्रा निघणार असल्याने ढोल ताशा पथकाना वादन करण्यासाठी मागणी वाढली आहे. मागील काही दिवसांपासून अनेक ढोलताशा वादक पथके सराव करीत आहेत. त्यामुळे पाडव्याच्या दिवशी वसई विरार नगरी ही ढोलताशाच्या गजराने दुमदुमून जाणार आहे.**

**वसईः** चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याला नवीन मराठी वर्षाच्या स्वगातासाठी वसई , विरारनगरी सज्ज झाली आहे. यानिमित्ताने शहरातील विविध ठिकाणच्या भागात पारंपारिक वेशभूषेत शोभायात्रा काढण्यात येणार आहेत.

दरवर्षी वसई, विरार शहरात मोठ्या उत्साहात गुढीपाडव्या निमित्ताने मराठी नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या जल्लोष केले जाते. ९ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या गुढीपाडव्यानिमित्ताने यंदाही शहरात विविध सामाजिक संस्था यांच्यातर्फे कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत.

नायगाव पूर्वेच्या जूचंद्र येथे युवा प्रतिष्ठान यांच्या तर्फे गुढीपाडव्यानिमित्ताने जूचंद्र परिसरात सकाळी ९ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

तसेच गुढीपाडवा नववर्ष स्वागतयात्रा समिती, वसई यांच्या तर्फे सुद्धा श्री दत्तमंदिर रमेदी-श्री राम मंदिर रामवाडी-श्री शनी मंदिर रामवाडी - ते श्रीकृष्णेश्वर महादेव मंदिर पारनाका पर्यंत शोभायात्रा काढण्यात येणार आहे.यावेळी ढोलताशा वादन, पारंपारिक लाठीकाठी प्रात्यक्षिके या स्वागत यात्रेचे विशेष आकर्षण असणार आहे. तर नवनिर्माण प्रतिष्ठान यांच्या तर्फे विरार खारोडी नाका ते राममंदिर पर्यंत शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. वसईतील तामतलाव दीपोत्सव समिती व मुळगाव सुतार आळी ग्रामस्थ सांस्कृतिक मंडळ यांच्या तर्फे संध्याकाळी ४ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पान क्र. १

# राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षास आर्थिक भ्रष्टाचारप्रकरणी गुन्हे शाखेकडून अटक

**मीरा-रोडः** मीरा-भाईंदरचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ( अजित पवार गट )चे जिल्हाध्यक्ष मोहन पाटील यांना आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी पहाटे अटक केली आहे. मोहन पाटील हे भाईंदर मधील नामांकित शिक्षण संस्थेचे माजी कार्याध्यक्ष होते. या संस्थेत भ्रष्टाचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात पाटील यांना अटक करण्यात आली आहे. पाटील यांना दुपारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. निवडणुकीची धामधूम सुरु असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जिल्हाध्यक्षाला अटक केल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे.

भाईंदरच्या आगरी समाजाच्या अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेच्या २०११ ते २०१९ या कालावधीत मोहन पाटील हे कार्याध्यक्षपदी होते. त्यांच्या कार्यकाळात संस्थेमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार व आर्थिक अपहार केल्याप्रकरणी संबंधितावर गुन्हे दाखल झाले होते. अभिनव शेतकरी शिक्षण संस्थेमध्ये खिचडी घोटाळा , डिजिटल ओळखपत्र आणि संगणक दुरुस्तीच्या नावाखाली सुमारे सहा कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात



आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संध्या पाटील यांच्या आदर्श महिला गटाकडून परस्पर शालेय पोषण आहारचे काम काढून मोहन पाटील यांनी ते स्वतःच्या मधुमोहन महिला बचत गटाला परस्पर दिले. शासनाचा योजनेतील तांदूळ विकला. संगणक व पोषण आहार मधील घोटाळ्याची तक्रार व सतत पाठपुरावा केल्यानंतर २०१९ मध्ये नवघर पोलीस ठाण्यात तत्कालीन कार्याध्यक्ष मोहन पाटील,संस्थेचे लेखापाल प्रशांत नरेश पाटील, रिंग इंडियाचे भागीदार न्यूमान रेहमान आणि कुणाल गुडेकर, संस्थेचे वासुदेव पाटील, गुरुनाथ पाटील , दिलीप पाटील, शरद पाटील यांच्यावर गुन्हा दाखल झाला.त्यानंतर हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. यानंतर पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत १० एप्रिल २०१९ रोजी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला.या अर्जानंतर पाटील यांच्या वकिलांनी वेगवेगळी कारणे सांगून ३२ वेळा तारीख घेतली. या प्रकरणात हळूहळू ४ वर्षे ९ महिन्यांचा कालावधी लोटला.न्याय मिळण्यास विलंब होत असल्याने मोहन पाटील यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने २५ जानेवारी २०२४ रोजी उच्च न्यायालयास एक महिन्यामध्ये सुनावणी घेऊन सदर अटकपूर्व जामीन अर्ज निकाली काढण्याचे आदेश दिले. उच्च न्यायालयाने २३ फेब्रुवारी २०२४ रोजी मोहन पाटील व प्रशांत पाटील यांचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले तर अन्य आरोपींना जामिनाचा दिलासा दिला. मोहन पाटील व प्रशांत पाटील यांचे अटकपूर्व जमीन अर्ज फेटाळल्यानंतर मोहन पाटील हे फरार झाले होते.तर प्रशांत पाटील याने आर्थिक गुन्हे शाखेत शरणागती पत्करली. अखेर आर्थिक गुन्हे शाखेने मोहन पाटील यांना शुक्रवारी अटक केली आहे. ठाणे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसाची म्हणजे ८ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

CamScanner

दैनिक यशोभूमि

# ऑन लाइन ठगी की शिकार हुई महिला को मिला न्याय

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड।** मीरा-भाईंदर वसई-विरार पुलिस के अंतर्गत काशीमीरा में रहने वाली तहसीना अफरोज खान को शेयर बाजार में निवेश करके अधिक लाभ पाने

## तहसीना खान को पैसे पुनः प्राप्त हुए

का लालच देकर ठगा गया। शिकायत के आधार पर पुलिस ने अज्ञात के खिलाफ मामला दर्ज कर तफ्तीश शुरू की। काशीगांव पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिस निरीक्षक राहुल पाटिल ने तत्काल संज्ञान लेते हुए शिकायतकर्ता के लेनदेन से सम्बंधित जानकारी बैंक से प्राप्त की तो पता चला कि शिकायतकर्ता का पैसा अलग-अलग बैंक खातों में भेजा गया है, तो तुरंत शिकायतकर्ता की राशि को फ्रीज करने के संबंध में संबंधित बैंक से पत्राचार कर संदिग्ध बैंक खाते को फ्रीज कर दिया गया, चूंकि खान के रुपये भी उसी खाते में थे तो पुलिस ने न्यायालय के आदेश के बाद उस फ्रीज किये गए खाते में से 4,50,000 रुपये शिकायतकर्ता के खाते में वापस जमा कर दिया और इस तरह ऑन लाइन फ्रॉड का शिकार बनी तहसीना खान को पुलिस के सहयोग से पैसे पुनः प्राप्त हुए।



CamScanner